Registered with RNI BHAVMALA
MAHABIL 06842/2013 Year-9, Issue-33, - April-May-Jun. 2022

Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती ______________________
______________________
______________________

If Undelivered return to :

**प्रेषक :-**

**प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे**
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

www.bhavmala.com ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-९ वे, अंक-३३, एप्रिल - मे - जून २०२२

• संपादक - प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे •



# त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून संशोधन लेख मूल्यांकन समिती

## (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०२२-२०२३ साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, औरंगाबाद | ९४२३२६१११४ |
| २. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ३. | प्रा. डॉ. प्रियदर्शनी देशमुख, चांदूर बाजार | ९०९६२६६८१६ |
| ४. | प्रा. डॉ. निलेश लोंढे, परभणी | ९७६३५०७१०१ |
| ५. | प्रा. डॉ. अतुल टेवरे, येवदा, अमरावती | ८२७५६५९७१० |
| ६. | प्रा. डॉ. माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९१ |
| ७. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदुरा रेल्वे | ९४२१७४६९७५ |
| ८. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| ९. | प्रा. डॉ. पुनम येसुंबरे, वर्धा | ९८९०९३३९८० |
| १०. | प्रा. डॉ. रुपेश कऱ्हाडे, दिग्रस, यवतमाळ | ९४२२८२२९६९ |
| ११. | प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे, उमरखेड, यवतमाळ | ९४०४१३५८७० |

**सूचना :-**

* या त्रैमासिकासाठी लेखकांनी आपले शोधनिबंध, कथा परीक्षण आदि साहित्य श्री लिपी ७०८ या फॉन्ट मध्ये पाठवावे.
* या त्रैमासिकासाठी वर्गणीदारांनी आपली वार्षिक वर्गणी पी.जे. वावरे, पी.एन. कॉलेज, पुसद यांचे नावे SBI Pusad Branch A/C. No. 10940932279, IFSC Code SBIN 0000459 Seving A/C या खात्यात जमा करावी.
* या त्रैमासिकासाठी वर्गणीदारांनी आपली वार्षिक फक्त बँक खात्यामध्येच जमा करावी. मनिऑर्डर पाठवू नये.



ISSN2395-0366

वर्ष - ९ वे

अंक मूल्य - ७५/-

एप्रिल-मे-जून २०२२

वार्षिक वर्गणी - ३०० रू.

* कला,साहित्य, भाषा, समाज, संस्कृती, संवर्धनाचे विचारपीठ *

# भावमाला

• मुख्य संपादक •

प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे

Email : drpjwawre@gmail.com

www.bhavmala.com

मुद्रण : निलेश प्रिंटर्स, आठवडी बाजार, पुसद, जि. यवतमाळ

प्रकाशक : अंजनी पब्लिकेशन, श्रीरामपूर, पुसद, जि. यवतमाळ

अक्षर जुळवणी व मांडणी : शशीकांत ना. यावले, अमरावती

मुखपृष्ठ संकल्पना : प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे, पुसद

मुखपृष्ठ : प्रो.डॉ. अशोक राणा, यवतमाळ, - ९३२५५१४२७७

संपादकीय पत्र व्यवहार : प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे, संपादक, भावमाला.

'प्रथमेश', २८/२९ ग्रीनपार्कनं. १, श्रीरामपूर, पुसद, जि. यवतमाळ ४४५२१५

संवाद संपर्क : ९४२१७७१७३३, ८८३०३२४१०९

## अंतरंग


**शोध निबंध-**

१) डॉ.सुभाष सावरकर यांच्या भूलभुलैय्याचे स्थूल अवलोकन - डॉ दिनेशचंद्र राऊत
२) गाविलगड वीरयोद्धा बेनिसिंह आणि वीरांगणा मातृशक्तीची शौर्यगाथा - डॉ.पृथ्वीराजसिंह राजपूत
३) नव्या जाणीवांचे साहित्य - प्रा. रणधिर शिंदे
४) उ. रा. गिरींची भावसमृद्ध कविता - प्रा. मीनल येवले
५) नवोदोत्तरी दोन कादंबऱ्या : सर्व प्रश्न अनिवार्य व उद्या - डॉ. प्रल्हाद वावरे

**परिक्षणे / प्रतिक्रिया -**

१) वऱ्हाडीच्या समृद्धिची शिदोरी-'मिसय' - अरूण विघ्णे
२) वैविध्यपूर्ण साहित्य पर्वणी : भावमाला - अरूण विघ्णे
३) एक परिवर्तनवादी विचार मांडणारा लेखसंग्रह- 'वर्तमानाचे फेसबुक' - अंबादास केदार
४) वास्तवदर्शन घडविणारी कादंबरी : 'भूईभेद' - भास्कर गायकवाड
५) सोसलेला पीळ - अविनाश पोईनकर

**कथा / ललित -**

१) पवनारची शेवंतामाय...शेवंता आजी - अंजनीसुत
२) वेडा (संकलित) - चि. ओंकार मनिष व्यवहारे

**नव्या पुस्तकांची ओळख -**

१) वेदनेला फुटे पान्हा - विकास गजापूरे
२) शेवंतीची फुलं - श्रीरंग रोडगे
३) पक्षिणी - लीला रोडगे

**कविता-**

१) मोर मोहरून गेला - शशी त्रिभूवण
२) खूपदा वाटतं.... - अनामिक
३) प्रज्ञासूर्य - प्रा. सुनिल तोरणे
४) गझल - रमेश बुरबुरे
५) .....येणार तू ! - प्राचार्य डॉ. देवेंद्र पुनसे
६) कलियुग - सुनिल लव्हाळे
७) भारत एक.... - सुनिल बावने
८) क्रांतिदूता - डॉ. रमाकांत ईटेवाड
९) देशभक्ती - राजेश चौरपगार
१०) साला मी अडाणी होतो.... - अनामिक
११) कोरोणा अजून संपलेला नाही - डॉ.संगीता अवचार
१२) माणूस नावाचा प्राणी - नरेशकुमार बोरीकर
१३) लोलक अभ्रगुलाली - सौ. विद्या देशमुख
१४) तरीही गाणे सुचून जाते - प्रा. अभय जोशी
१५) गांधारी होऊच नका कोणी - डॉ. संगीता आवचार
१६) तू ग अनाथांची माय - मोहण खोत



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्कक्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशित केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




## संपादकीय....

मित्रांनो,

गेले आठवर्ष भावमाला त्रैमासिकाने माझ्या मराठी रसिकांच्या मनावर एक भावनिक पकड निर्माण केलेली आहे. एप्रिल-२०२२ चा नवव्या वर्षातील पहिला आणि आजवरचा ३३वा अंक आपले हाती सोपवतांना मनस्वी आनंद होत आहे. गेली दोन वर्ष भयानक दडपणात भितीदायक वातावरणात गेलीत तरीही डगमगलो नाही सर्व अंक पुढेमागे काढलेत. अत्यंत भिषण परिस्थितीचा सामना या काळात केला कितीतरी जिवलग मित्रांना आपल्यापासून हिरावून नेलय काळाने....दु:खद आणि तेवढाच अतिव वेदना देणारा हा काळ, ज्याचा मनावर विपरीत परिणाम झाला....याही परिस्थितीत अनेक लेखक कविंनी सार्थ साथ दिली. त्यांचा मी आभारी आहे. मानवी जीवन यातनांनी भरलेलं असतं साहित्यात याचं प्रतिर्बिब उमटत असते. आज समाज आणि राजकारण एका वेगळ्या भितीने दबलेलं आहे मानसं एकमेकांना पाण्यात पाहत आहेत, धर्मांध आणि सत्तालोलूप होऊ पाहत आहेत याचेही भिषण परिणाम मानवी जीवनावर होतांना दिसत आहेत.

स्वप्नांना धुमारे फुटावित आणि सर्व माणसं सुखी व्हावीत कोणताही कोरोना आता इकडे चाल करू नये असं वाटत....आपण आशेचे पंख लेवून बसलेलो आहोत. ही पंख कायम जगण्याला बळ देवोत ही अपेक्षा करू या....या त्रैमासिकात आशावादी माणसं लिहीतात, व्यक्त होतात, सुंदर वर्णन करतात जगण्याचं, खरंतर हेच भावमालेच सुयश आहे. आज चांदा टू बांदा भावमालेचे वाचक-लेखक आहेत ते मलाही प्रेरणा देतात. कष्ट कितीही झाले तरी हा अंक त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याच कार्य करतो. त्यांचेही प्रोत्साहन मिळते याचा आनंद मिळतो. येणारा काळ जरी आपल्या जिवावर उठणारा असला तरी त्यालाही आपण पूरून ऊरू अशी अपेक्षा करू या.....आपण सारे एकमेकांना समजून घेऊन जीवनाला अजून सजग करू या...शेवटी पुनच्च नवव्या वर्षात पदार्पण करतांना आनंद सर्वांच्या वाट्याला येवो या सदिच्छेसह आपले सर्वांचे मनस्वी आभार...आपण याहीपुढे उत्तम लेखन करून भावमालेला प्रेरणा द्यावी अशी अपेक्षा करतो.

-मुख्य संपादक

**प्रोफेसर डॉ. प्रल्हाद वावरे**

संपादक, भावमाला



# डॉ.सुभाष सावरकर यांच्या 'भूलभुलैय्या'चे स्थूल अवलोकन

- प्रा. डॉ. दिनेश कि. राऊत
युवाशक्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय,
अमरावती, मो. नं. ९७६४६८८१५८

मराठी साहित्यातील साठोत्तर चळवळीतील जनसाहित्य विचाराचे विवेचक आणि समीक्षक तसेच राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेतील दर्शनाचे तत्वचिंतक म्हणून ओळखले जाणारे डॉ.सुभाष सावरकर हे मुळात कथाकार तसेच कादंबरीकार आहेत. १९७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कथासंग्रहातील कथांचा हा धावता परिचय होय.- संपादक डॉ. सुभाष सावरकर यांच्या कथालेखनाचा प्रारंभ वर्ष १९७३ पासून (म्हणजे त्यांना पीएच.डी. पदवी मिळाल्यानंतरच) झालेला असून पुसद (यवतमाळ) च्या 'सोनाली' मासिकाच्या दिवाळी १९७४ अंकानिमिताने जी कथास्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यासाठी लिहिलेली व प्रथम पारितोषिकाने गौरविली गेलेली 'अपौरुषेय' ही कथा म्हणजे प्रकाशित झालेली त्यांची पहिली कथा होय. 'फौजदार' साप्ताहिकाने आयोजिलेल्या कथास्पर्धेतही (१९७५) 'फीनिक्स' या त्यांच्या कथेला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच 'मायमराठी' या दिल्लीहून निघणाऱ्या त्रैमासिकाच्या कथास्पर्धेत (वर्षारंभ १९७६) 'प्रदूषण' या कथेला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. 'भूलभुलैय्या ही दीर्घकथा सोनाली' मासिकाच्या मार्च १९७५ च्या अंकात प्रसिद्ध झाली; तर 'सुबोधरंजन' साप्ताहिकाच्या १९७६ च्या स्वातंत्र्यदिन विशेषांकात सूर्यसूक्त' ही कथा प्रथम प्रसिद्ध झाली. जानेवारी १९७६ च्या सुमारास कल्याण पिक्चर्स सिने सर्किट असोसिएशन (अमरावती)ने आयोजिलेल्या चित्रपट विषयावरील निबंधस्पर्धांमध्ये डॉ.सुभाष सावरकरांनी एकंदर ३ निबंध वेगवेगळ्या मित्रांच्या नावावर सादर केले त्या तिघांनाही पुरस्कार मिळाले. मित्रांनी ते स्वीकारलेही; मात्र ठरल्याप्रमाणे पुरस्कारांची रक्कम मात्र डॉ.सुभाष सावरकर यांनी एकत्र करून त्या रकमेतून 'भूलभुलैय्या' या पहिल्या कथासंग्रहासाठी कागद खर्चाची लागत करून टाकली व त्या रकमेवर त्यांचा पहिला कथासंग्रह स्वातंत्र्यदिन १९७६ च्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध झाला! 'भूलभुलैय्या' या कथासंग्रहाला मराठीतील प्रसिद्ध समीक्षक विचारवंत-विद्वान प्राचार्य नरहर कुरुंदकरांची प्रस्तावना लाभली असून सोळा पृष्ठांच्या या प्रस्तावनेत प्रा.कुरुंदकरांनी यातील कथांच्या अस्सलपणाबद्दल व जाणिवेच्या प्रामाणिकपणाबद्दल ग्वाही देत असतानाच शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण तिरकसपणा



व गंभीर चिंतनास बाध्य करणारा विनोद याबद्दलही त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

'भूलभुलैय्या' या संग्रहातील पहिली कथा 'अपौरुषेय' ही होय. या कथेचा नायकरंजन-जोशी हा इलेक्ट्रिक पॉवर हाऊसमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर असतो. त्याला ड्यूटीवर जातानाच्या रेल्वेच्या प्रवासात त्याचीच भयप्रद प्रतिकृती दिसते; आणि ती त्याला भूतकालातःगुदरलेला काहीएक जीवघेणा असा भयंकर प्रसंग आठवून देते. भ्यालेल्या मनःस्थितीत, पलिकडून येणाऱ्या एका मालगाडीची आकस्मिक धडधड त्याच्या मनावर जबरदस्त आघात करून त्याचे अस्तित्वच बधीरकरून टाकते. त्यातच त्याची ती प्रतिकृती एकएकी नाहीशी होते; आणि त्याला वाटते-आपण आत्महत्या केली!-आपण जिवंत नाही.

ड्युटीच्या स्थळी आल्यावर आपण आपण स्वतः अस्तित्वात नसल्याच्या आविर्भावात तो बिनधास्त जगू पाहातो. मात्र नीला नावाच्या त्याला आवडणाऱ्या एका नवथर तरुणीची कसलीशी भीती त्याला सतत वाटत राहाते. त्याने तिला लग्नाची ऑफर सुद्धा दिलेली असते. तीही एका पायावर तयार असते- अगदी आईबापाला सोडून त्याच्याकडे पळून सुद्धा यायला तयार असते. पण कुठल्यातरी भयानक प्रसंगातून गेल्यासारखा तो तिला टाळू पाहात असतो. त्याला वाटते, आत्महत्या केली असल्याची बातमी तिला परस्परच कळावी; म्हणजे प्रत्यक्ष समोरासमोर नामुष्की नको! तो भयानक प्रसंग असा- एकदा ठरवून, कळवून नीलाच्या दीर्घ भेटीसाठी म्हणून तो जातो; पण चुकामूक होते; आणि एका चालू' मित्राच्या संगतीत अडकून तो भरपूर गावठी दारू झोकून त्याच्यासोबत थेट वेश्येकडेच जाऊन पोहोचतो. तिथल्या किळसवाण्या - पशुतुल्य बाजारू गतिविधींनी त्याच्या साऱ्या शरीर वासनाशमनाच्या रोमँटिक अपेक्षांचा चुराडा होतो आणि तो त्या भोगवासनांच्या रानटी वातावरणात अक्षरशः षंढ ठरतो! त्याचे अस्तित्वच हादरून, विझून, मिटून जाते. आपल्या अस्तित्वशून्यतेची बातमी परस्पर नीलास कळावी असे त्याला वाटते. तिकडे सुखाची, प्रणयाची, संसाराची ओढ प्रकट करणारी नीलाची साचलेली पत्रे त्याला ड्रॉवरच्या तळाशी एकदम दिसतात आणि मानसिक तणावाने त्याला ग्लानी येते. मनोरुग्ण समजून त्याची तपासणीही होते. त्या तपासणीत तो जाणूनबुजून विक्षिप्त उत्तरे देतो. तशातच नीला हिस्टेरिक झाल्यामुळे आत्महत्या करून मोकळी होते. तिच्या आत्महत्येची बातमी ऐकून त्याला वाटते, नीलाशी लग्न करून आपण तिची फसवणुकच करणार होतो! तिनेही मग त्या वेश्येप्रमाणेच वैतागून आपला तिरस्कार केला असता! त्याला वाटते, ती आत्महत्या करून सुटली, पण मला मात्र सुटका नाही. आपले वेदनामय अनुभव शब्दबद्ध केल्याविना, आपल्या वेदनांचा वेद रचल्याविना आपल्याला सुटका नाही. इथे ही कथा संपते. म्हणूनच मग

'अपौरुषेय' याशीर्षकाचाअर्थजसा नायकाच्या षंढत्वाच्या शोकात्म, शोकपर्यवसायी अनुभवकथनाशी निगडित आहे, तसाच नायकाच्या अखेरच्या संकल्पामुळे तो वेदनेच्या वेदा'शी-म्हणजे साहित्यनिर्मितीच्या प्रयोजन व प्रक्रियेशीही जुळलेला असल्याचे वाचकाला जाणवल्याशिवाय राहात नाही.

या संग्रहातील 'फीनिक्स' या दुसऱ्याही कथेत दुभंग व्यक्तित्वाचा घोळ आहे. या कथेचा नायक बॉब हा मध्यमवर्गीय तरुण स्वकष्टाने प्रगती करून शून्यातून विश्व निर्माण केलेला नायक आहे. तो उद्योगपतींच्या वर्तुळात वावरणारा असून अविवाहित आहे. त्याची स्टेनो लिली प्रेग्नंट आहे. त्यामुळे तो तिला आता विटला आहे.

लोतासारख्या नव्या मुलींशीही त्याला संबंध प्रस्थापित करायचे आहेत. म्हणून तो तिला आपल्या पाचगणीच्या बंगल्यात गरोदरपणासाठी पाठवून पिच्छा सोडवतो. तशात भुरभुर पावसात त्यालाओव्हरकोट-हॅट घातलेली, गूढ वाटणारी असी स्वतःचीच प्रतिकृती दिसते.

खेड्यातला गरीब भाऊ सदाशिव येऊन भेटतो आणि म्हातारी आई विहिरीत पडून अत्यवस्थ झाल्याचे सांगतो. त्याला पैसे देऊन वाटेला लावतानाच तो शुक्रवारी येण्याचे वचन देतो. बोथटपणे-कोरड्या आविर्भावातच सख्ख्या भावाला कटवतो. कर्तबगारीच्या अहंकारात असतानाच पुन्हा त्याला ती प्रतिकृतीआडवी जाते. लोलिताच्या व्यामोहात निघाला असतानाही पुन्हा त्याला तीच प्रतिकृती भेटते. तिला तो आमंत्रण देतो. प्रतिकृती तिरकस बोलते.

शुक्रवारी प्रतिकृतीसोबत 'बर्थ डे वाईन' घेत तो मनोमन कावा करतो. त्या प्रतिकृतीला खूप पाजतो आणि उशी नाकातोंडावर दाबून गुदमरून ठार मारतो. अशाप्रकारे स्वतःच्या त्या प्रतिकृतीपासून पिच्छा सुटल्याच्या आनंदात तो लोलिताला फोन लावतो तर त्यातून 'म्हाताऱ्या आईचा बाबू बाबू' म्हणून आक्रोश, तर कधी लिलीचा 'बॉब बॉब' म्हणून टाहो ऐकू येतो आणि त्यामागोमाग ऐकू येते मोटर अपघातातली तिची प्रदीर्घ किंकाळी.

त्यानंतर पुन्हा वेषांतर केलेली त्याची ती प्रतिकृती सामोरी येते. ती दरडावते यूआर अंडर अरेस्ट!... लिलीनं आत्महत्या केली आहे ! आणि मग बाबू उर्फ बॉबला तीव्रपणे जाणवते- आपल्याला भूतकाळाच्या बंदिवासातून आयुष्याच्या अखेरपर्यंत सुटका नाही!

'प्रदूषण' ही कथा एका देशभक्ताच्या नावावर असलेल्या शैक्षणिक संस्थेतील कृष्ण कारस्थानांचे दर्शन घडविते ते नव्याने रुजू झालेल्या 'तो' या प्राध्यापकाच्या


ISSN2395-0366

नजरेतून ! तिथले दोन नियमही त्याने नोकरीच्या नितान्त गरजेपोटी मान्य केलेले असतात. काळा चष्मा लावून वावरणे (म्हणजे जाड ठशाचीच पुस्तके वाचणे) आणि हमरस्त्यानेच फिरणे ! अर्थात् प्रस्थापित ज्ञानच देणे-घेणे आणि ठाशीव-घाशीव मार्गातूनच चालणे. त्याच्या विरोधात रांगणेकर नावाच्या चळवळ्या तरुण विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा संप होतो. व्यवस्थापनातले मुखवटेधारी यंत्रमानव या शिस्तीचाभंग झाल्याबद्दल चौकशी करून शिक्षा मुक्रर करीत असतात. रांगणेकराची चौकशी होते आणि ट्रकखाली चिरडून त्याला ठार मारण्यात येते. कु.अर्चना ठाकूर नावाच्या सुस्वरूप तरुण विद्यार्थिनीचीही चौकशी ठरते : रांगणेकरशी तिचे संबंध असल्याचा मनोनीत आरोप लावून तिच्यावर आळीपाळीने बलात्कार करण्यात येतो. तिसरी चौकशी त्या महाविद्यालयाच्या वयस्क प्राचार्यांची होते ती-हिशेबावर सह्या करतेवेळी चष्मा काढण्याची परवानगी त्यांनी मागितल्यामुळे. त्यावेळी मात्र ते म्हातारे प्राचार्य व्यवस्थापनाचे दडपण झुगारून बाणेदारपणाने राजीनामा देऊन मोकळे होतात.

'तो' निषिद्ध क्षेत्रात जातो. वास्तवाचं जिवंत रूप पाहून त्याची प्रज्ञा-प्रतिभा तरतरीत होते. पण त्यालाही चौकशीचा खलिता मिळतो. संध्याकाळी त्याची चौकशी होणार असते- मेणबत्त्यांच्या उजेडात, चष्म्यांच्या अंधारात । त्याच्या चौकशीदरम्यान समज देण्यात येते: अमिषही दाखवण्यात येतातः प्राचार्यपद, आवडीच्या मुलीशी विवाह, प्रबंधाचे प्रकाशन, टेक्स्टबुकाचे अभ्यासक्रमात समावेशन, आर्थिक लाभ इत्यादि. चौकशी अधिकारी म्हणून बसलेली चांडाळचौकडी जेव्हा स्वतःचे काळे चष्मे काढून दाखवते, तेव्हा प्रदूषणाने बटबटीत, आक्रमक आणि भयावह झालेल्या त्यांच्या त्या डोळ्यांची केवळ शिसारी त्याला येते. घरी आईबहीण-वडील यांच्या दुर्दशेचीही शिसारीच, सर्व विपरित अनुभवांचा लगदा म्हणजे शिसारी ! चीड, आनंद, दुःख, संताप, करुणा, भिती, तिरस्कार यांचा चिकट लगदा.' असे त्याला वाटते. तो सकाळी उठतो तेव्हा त्याचेही डोळे त्या रोबोंच्या डोळ्यांसारखे झालेले त्याला दिसतात! भय, मोह, स्वार्थ, कोडगेपण यांचे रसायन बनलेल्या प्रदूषणाने तो घेरला जातो. आणि स्वतःच त्या प्रदूषित रोबोंच्या समूहाचा एक भाग होण्यास मान्यता देतोअर्थात प्राचार्य पदाचे त्यांनी दिलेले प्रलोभन मनाविरुद्ध असूनही अगतिकपणाने स्वीकारतो!!

'भूलभुलैय्या' या कथेत जगआणि मन या दोहोंतल्या विसंवादातून जन्मलेल्या वेदनांच्या स्मृतिसावल्या सर्वत्र भेटत जातात आणि वास्तवाच्या कडेकडेने मनाचे पापुद्रे सोलले जातात; अंतर्मनातली दालने उघडलीझाकली जातात. गढी हे येथे मनाचे त्याचबरोबर पंरपरेचेही प्रतीक असून या कथेचा नायक 'मी' पूर्णतः वेदनामय सावल्यांनी


ISSN2395-0366

घेरलेला, ग्रासलेला आणि छळलेला आहे. वृद्ध काळपुरुष, ग्रहगोलांची प्रतीकरूपे बनून आलेले सखे सवंगडी आपापल्या गतिविधींच्या अनुषंगाने या 'मी' ला वळण लावण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांच्या स्वतःच्याच बाबतीत 'नो न्यूज अबाऊट मायसेल्फ' अशी अवस्था असल्याचे ध्यानात येताच हा 'मी' गढीतच स्वतःचे अस्तित्व हुडकण्याचा प्रयत्न करीत एका सब्बलच्या बळावर आपली मुळं लागेपर्यंत आपलेच घट खोदत राहायचा निर्धार करतो.

खोदताना त्याला आपल्या घटाबद्दल- आपल्या गढीबद्दल अनेकानेक सुप्त/प्रकट रहस्यांचा छडा लागत जातो. अनेक भगदडं आधीच तयार असेलली आणि विचित्र प्रकारे 'मी' च्या स्वतःच्या आयुष्यातील घटनांशी जुळलेली असल्याची त्याला जाणीव होते. कोणीतरी आधीच बांधून काढलेल्या पायऱ्यांवरून उतरणं 'मी' ला मानवत नाही. ती दिशाच बदलून तो दुसऱ्या दिशेने खोदायला सुरुवात करतो. सर्वतंत्रस्वतंत्रता आणि खाजगीपण याबद्दल हा मी फार जागरूक आहे.

पूर्णतया स्वतःचे असे हे घट खोदत असताना द्वेष, त्वेष, चीड अशा भावनांचे उसळणे आणि शमणे यांमधून पुढे तो एका आरसेमहालात उतरतो आणि तिथल्या स्वतःचीच विविध गुणधारी मानवी रूपे पाहून अस्वस्थ होतो व सर्व आरसे फोडून मोकळा होतो. पुढे दालनादालनांचे प्रचंड विवर. त्याला एका विहिरीत काळपुरुषाशी भेट होते. त्याच्या व्यवस्थापनाखाली भूत आणि वर्तमानाची दालने पाहून अनुभवून तो 'मी' प्रचंड व्यग्रता अनुभवतो. वर्तमानात स्वतःच स्वतःला चवीने तोडून खाणारा 'मी' अनेक रूपांत त्याला दिसतो आणि वर्तमान सावल्यांच्या धाकाने तो जेव्हा चुकून भविष्याच्या दालनात जाऊन पडतो तेव्हा काळपुरुष भविष्यपुराण आणि संगणक यांच्या संगनमताने भविष्याची विधाने आधीच जुळवून ठेवीत असल्याचा त्याला संशय येतो आणि ती विधाने खोटी ठरवण्याच्या जिद्दीने द्वंद्वास सिद्ध झालेल्या काळपुरुषावर गनिमी हल्ला करून तो कंट्रोलरूमच्याच नव्हे तर बोगद्याच्याही बाहेर पडतो. गढीच्या तळघरातील माती खड्ड्यात लोटून वर जाजम टाकून गढीच्याही बाहेर पडतो आणि काळपुरुषाने लिहू घातलेले 'मी'च्या मृत्यूचे तर्कशुद्ध भविष्य आणि त्यानुसार तयार ठेवलेला 'मी'चा पुतळा व त्याखालचा कोरीव लेख-सर्वकाही एका उत्स्फूर्त कृतीने आपल्याखोटे ठरवून मोकळा होतोः मोकळ्या हवेत, सूर्यप्रकाशात जायला!

'सूर्यसूक्त' ही या कथासंग्रहातील पाचवी कथा म्हणजे खरे पाहाता पुढे १९७९ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सूर्यसूक्त' या आगामी कादंबरीची नांदीच होय. या कथेतला 'तो' आत्मरतीच्या कचाट्यातून सुटून परंपरेच्या गढीपासून दूर दूर - 'स्वच्छ सूर्यप्रकाश



आणि अक्षय प्राणशक्तीच्या शोधात' निघाला आहे- गढी सोडून तो पुलाखालच्या मार्गे विचारतो. पुलाखालच्या अंधारवाटेने जात असता त्याला अर्धवट उघडी वही आणि पिसाची लेखणी टाकून अस्ताव्यस्त पडलेला एक हडकुळा म्हातारा दिसतो. तो म्हातारा म्हणजे एक कवी असून त्याच्या मनात बाजूला उद्याच्या प्रकाशयुगासाठी सूर्यसूक्त रचायचा संकल्प होता. 'तो' च्या उजेड आशेला फोल ठरवीत कवी म्हणतो- अंधार अनादिअनंत आहे- उजेडआशा आणि तिचा हा शोधमार्ग व्यर्थ आहे. अंधार जगाच्या अधिकाऱ्यांनी हद्दपार केल्यामुळे खंदकाबाहेर येऊन मी प्रकाशगीते गात फिरतो. तो म्हातारा कवी म्हणतो खंदका आतल्या खुज्या खुरडणाऱ्या जिवांना आवाहन/प्रबोधन करणे व्यर्थ आहे; माझे सूर्यसूक्त माझे महाकाव्य त्यासाठी नाही.

त्यावर तो म्हणतो- तुझी स्वातंत्र्यकल्पना फसवी आहे; तसं तुझं सूर्यसूक्त महाकाव्यही परभृतच राहील. त्याच भूमीच्या शिदोरीवर जगत असूनही कृतघ्नतेनं तू तिच्याबददलचे तुझे कर्तव्य नाकारीत आहेस. तुझा सूर्य वांझोटा आहे. तुझं सूर्यसूक्त ही सुद्धा एकप्रकारची आत्मरतीच आहे. सूर्यसूक्तात मंत्रसामर्थ्य अवतरते ते समूहस्पंदनाच्या लयीवरच; आत्मरतीत नाही. खुज्यांना टाळण्यासाठी अंधाराचाआश्रय घेणे हे सूर्यसूक्ताला संमत असू शकत नाही. तुला नव्या सूर्यसूक्ताचा नवा छंद अजून गवसलाच नाही.

कवी म्हणतो- कधी ना कधी माझ्या सूर्यसूक्ताच्या शब्दांना मंत्रशक्ती लाभेल, या एकाच आशेवर मी जगत आहे. तेव्हा तू माझ्यासोबत चल. तो म्हणतो- मी जाणार आहे खंदकाआतल्या त्या उद्ध्वस्तभूमीवरल्या खुज्यांसोबत जगायला.

इथून दोघांचे मार्ग भिन्न झाले. कवी आपली दिवटी घेऊन खंदकाच्या काठकाठाने अंधारदरीत दूर निघून गेला आणि मतो' निघाला : अंधार-उजेडाच्या सीमारेषेवर नेऊन पोहोचविणाऱ्या पूर्वीच्याच अंधारवाटेवरून नव्या उत्साहाने भरल्यासारखा. एका दगडावर ठेचाळून तो जमिनीवर पडला आणि उठत असतानाच एक वाकडी अंधारकपार त्याच्या हाताला लागली. त्या घळीत चाचपडत तो पुढे सरकत गेला आणि अशा एका खंदकातल्या रहस्यगर्भ जागेत पोहोचला; जिथून फक्त वरचे आकाशछत्र दिसावे आणि खाली सर्वत्र मुळांच्या जाळीने वेढलेली गुंतागुंत. हातापायतलं त्राण संपलं तरी शेवाळातून सरकत-सरपटत त्यानं तो खंदक पार केला.

त्या कवीच्या कर्कश शब्दांचे आव्हान त्याला पुढे रेटत होते आणि कानात जणू कोणी ओरडत होतं उद्ध्वस्त धरेच्या त्या चिमूटराखेतून

निर्मायची आहे ना तुला स्वर्गभू?
कर मनाचा दगड

दडव बीजांची वज्रमूठ
आणि हुंदक्यांना तोलून पोवळदिठीत
नीघ येथून पुढे....
थांबू नकोस...... थांबू नकोस
(सूर्यसूक्त – भूलभुलैय्या)

एकंदरीत भूलभुलैय्या मधील कथांचा मूल्यभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल. 'अपौरुषेय'– संवेदनबधीर जगात संवेदनशील मनुष्य पंढ ठरतो. मात्र आत्मवंचनेत जगण्यापेक्षा प्राप्त विपरितांचा सामना करण्यातच मनुष्याचा गौरव आहे. 'फिनिक्स' झगमगाटी उपभोग संस्कृतीच्या लालसेने स्वतःची नाळ अव्हेरून पोकळ आत्मवंचनेसह जगणारा भाणूस अखेरीस स्वतःच स्वतःचा गुन्हेगार ठरतो. प्रदूषण कौटुंबिक जबाबदाऱ्यांपायी अनैतिक तडजोड स्वीकारून स्वतःच्या हतबलतेमुळे समाजहिताला दगा देणाऱ्या दुबळ्या माणसाची आत्मवंचना या कथेतून चित्रित झाली असून क्रूर व्यवस्थेपुढे भावुक माणसाला क्षुद्र जंतू बनून राहावे लागते हे दर्शन या कथेतून घडते. मभूलभुलैय्या असुरक्षिततेच्या भीतीपायी जनजीवनाला टाळून एकाकी आत्मशोध घेणारा माणूस अखेरीस निरर्थक गुंताळ्यात गुंतत जाऊन विनाकारणच काळाचे भक्ष्य ठरतो; वस्तुतः खुल्या जीवनव्यवहारातच काळपुरुषावर मात करण्याचे सामर्थ्य आहे–असे संज्ञान या कथेतून प्राप्त होते. 'सूर्यसूक्त' मानवी समाजाच्या जीवनकळांचे नियंत्रण करणाऱ्या जुलुमी, बलिष्ट व एकतंत्री व्यवस्थेच्या विरोधात समाजमुक्तीसाठी उभे राहिलेल्या अपवादभूत 'एका'च्या संघर्षाची ही यातनामय गाथा परंपरा व लोकमानसाशी आपला धागा जोडून घेते. कथेचा सांगडा विज्ञानकथेचा असला तरी संज्ञान मात्र लोकमानसातील क्रांतिकारी परिवर्तनाचे आहे.

***


अंजनी पब्लिकेशन्स
ग्रीनपार्क नं. १, श्रीरामपूर, पुसद जि. यवतमाळ
संपर्क : ९४२१७७१७३३, ८८३०३२४१०९
आमचे कडे आयएसबीएन क्रमांकासह योग्य दरात पुस्तके तयार करून मिळतील.




# गाविलगड वीरयोद्धा बेनिसिंह आणि वीरांगना मातृशक्तीची शौर्यगाथा

– प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत

भारताच्या मध्यभागातली पर्वत शृंखला अमरकंटकपासून गुजरातच्या सीमेपर्यंत पसरलेली आहे. या पर्वतराजीस विंध्याचल, सातपुडा, मेळघाट इत्यादी नावांनीही संबोधले जाते. घनदाट वनराई आणि वन्य प्राणी संपदेने समृद्ध असलेला सातपुडा एक परिपूर्ण परिसंस्था (Ecosystem) म्हणून ओळखला जातो. आपला राष्ट्रीय प्राणी पट्टेदार 'वाघ' ही या डोंगरदऱ्यांची, विशेषतः मेळघाटची शान आहे. भारत सरकारने 'गुगामल व्याघ्र प्रकल्प' अंतर्गत हा परिसर 'अभयारण्य' म्हणून घोषित केला आहे. कोरकू, बलई, निहाल, मोंग्या, राठ्या, गवळी हे येथील मूळ रहिवासी आहेत. त्यांची संस्कृती, भाषा, लोकगीते, लोककथा, वेशभूषा, चालीरीती इत्यादी सर्वार्थाने वेगळे आहेत. या पर्वतराजीचा संदर्भ रामायण–महाभारताशी जोडला जातो. रामायणातील मुख्य पात्र 'रावण' आणि 'मेघनाथ' यांच्या नावाने सण साजरे करण्याची परंपरा येथे आहे. एक समज असाही प्रचलित आहे की, पांडव अज्ञातवासाच्या काळात वेषांतर करून येथील विराट राजाच्या नगरीतच राहत होते. महान कर्मयोगी कृष्णाशी संबंधित 'रुक्मिणी हरण' ही घटना सुद्धा या पर्वतरांगातून उगम पावणाऱ्या नद्यांच्या तटावर वसलेल्या 'कौंडण्यपूर' आणि 'अंबानगरी'शी संदर्भ जोडून आहे. पौराणिक ग्रंथांमध्ये उद्धृत प्रसंगांना सुसंगत असलेली येथील अनेक ठिकाणे आणि परंपरा याचा पुरावा देतात.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर एक नजर टाकली तर मेळघाटातील योद्ध्यांचे शौर्य आपल्याला थक्क करून टाकते. गाविलगड, नरनाळा, आमनेर, मैलगड तसेच सभोवतालच्या परिसरातील भव्य वास्तूंचे अवशेष या ठिकाणच्या वैभवशाली इतिहासाची गाथा सांगतात.

गाविलगडाने एक हजार वर्षांच्या आठवणी साठवून ठेवल्या आहेत. गडाच्या नावावरूनच त्याच्या निर्मात्याची कल्पना करता येऊ शकते. 'गवळी' म्हणजे गार्यींचे पालन–पोषण करणारा गुराखी. पौराणिक संदर्भानुसार यादव कुलभूषण गोपालक कृष्ण स्वतः इथे आले होते. बहुधा त्यांच्याबरोबर यादववंशी सुद्धा आले असावेत. वैदर्भीय राजकन्या रुक्मिणीच्या हरणानंतर एखाद्या भविष्यकालीन योजने अंतर्गत त्यापैकी काही शूर यादवांना येथे वसविले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

युग बदलत गेले, सामाजात मोठ्या प्रमाणात बदल झाले आणि जगण्याचे संदर्भही बदलले. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे ही मानव प्राण्याची मूळ प्रवृत्ती आहे. सातपुड्यातील निबिड अरण्ये, त्यातील मौलिक वनसंपदा, बारमाही जलस्रोत, सुपीक जमीन आणि अनुकूल हवामान यामुळे येथील जीवन समृद्ध होऊन जीवनसंघर्ष सुद्धा कमी झाला